PDF brought to you by ResPaper.com

# CBSE Class X 2012 : MARATHI

**Answer key / correct responses on:**

Click link: http://www.respaper.com/cbse10/141/8514.pdf

Other papers by CBSE10 : http://www.respaper.com/cbse10/

**Upload and share your papers and class notes on ResPaper.com. It is FREE!**
**ResPaper.com has a large collection of board papers, competitive exams and entrance tests.**

http://www.respaper.com/

Series BRH

कोड नं.
Code No. **8**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ 4 हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में 8 प्रश्न हैं ।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है । प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जाएगा । 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे ।
- Please check that this question paper contains 4 printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains 8 questions.
- **Please write down the serial number of the question before attempting it.**
- 15 minutes time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# संकलित परीक्षा – II

# SUMMATIVE ASSESSMENT – II

# मराठी

# MARATHI

*निर्धारित समय : 3 घण्टे*
*Time allowed : 3 hours*

*अधिकतम अंक : 80*
*Maximum Marks : 80*



Click for Answer Key: http://www.respaper.com/cbse10/141/8514.pdf

## SECTION A – (Grammar)

1. (a) 'काल आमच्याकडे पाहुणे आले होते' या वाक्यातील काळ कोणता ? *1*
   (i) वर्तमानकाळ
   (ii) भूतकाळ
   (iii) भविष्यकाळ

   (b) 'आम्ही विमानाने दिल्लीला जाऊ' या वाक्यातील काळ कोणता ? *1*
   (i) भविष्यकाळ
   (ii) भूतकाळ
   (iii) वर्तमानकाळ

   (c) 'मृणालने गाणे म्हटले' या वाक्यातील काळ कोणता ? *1*
   (i) भविष्यकाळ
   (ii) भूतकाळ
   (iii) वर्तमानकाळ

2. (a) खालीलपैकी कोणते वाक्य शुद्धलेखनाच्या नियमांना अनुसरून आहे ? *1*
   (i) वाघाने गाइवर झडप घातली.
   (ii) वागाने गाईवर झडप घातली.
   (iii) वाघाने गाईवर झडप घातली.
   (iv) वाघाने गाईवर झडप घातलि.

   (b) खालीलपैकी कोणते वाक्य शुद्धलेखनाच्या नियमांना अनुसरून आहे ? *1*
   (i) विहिरीत एक कासव तरंगत होते.
   (ii) वीहिरीत एक कासव तरंगत होते.
   (iii) विहिरित एक कासव तरंगत होते.
   (iv) विहिरीत ऐक कासव तरंगत होते.

## SECTION B – (Composition)

3. तुम्हाला आपल्या वाढदिवसाच्या पार्टीकरिता मित्रमैत्रिणींना निमंत्रण द्यावयाचे आहे. त्यासाठी निमंत्रणपत्राचा मसुदा तयार करा. *10*

**किंवा**

तुमच्या शाळेच्या हस्तलिखित मासिकाच्या प्रकाशनसमारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यासाठी एका लेखिकेस पत्र लिहा.

4. (a) पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा : *7*

   भारत देश म्हणजे पृथ्वीचा मुकुटमणी आहे. त्यामध्ये नैसर्गिक संपत्तीचे विपुल भांडार आहे. सगळे महत्त्वाचे धातू भारतात सापडतात. गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी, कावेरी आणि नर्मदा आपल्या अमृतजलाने त्याच्या भूमीचे सिंचन करतात. येथील कसलेल्या जमिनीत सदैव सोने पिकते. ऋतूंचे चक्र सदैव मनाला आकृष्ट करते. भारतभूमीच्या आकर्षणाने विदेशी लोक नेहमीच आकर्षित होतात. अनेक विदेशी लोकांनी येथे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने



Click for Answer Key: http://www.respaper.com/cbse10/141/8514.pdf

येऊन ज्ञान आणि वैभव प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. अनेक महापुरुषांनी येथे जन्म घेऊन मानवतेचा बोध केला. रामाची मर्यादशीलता, कृष्णाचा कर्मयोग, गौतमाची अहिंसा, युधिष्ठिराचा धर्म, कर्णाची दानशूरता, अर्जुनाचे युद्धकौशल्य आणि महावीराची करुणा ही जीवनचारित्र्याच्या आदर्शांची अनुपम उदाहरणे आहेत. भारताचा इतिहास गौरवाच्या सर्वोच्च शिखरावर पोचलेला होता. नालंदा आणि तक्षशिला यांसारखी विद्यापीठे ज्ञान आणि विज्ञानाच्या अध्ययनाची अद्भुत केंद्रे होती. पाणिनीसारखे वैय्याकरण आणि चाणक्यासारखे अर्थशास्त्रज्ञ व राजकारणपटू तक्षशीला विद्यापीठाचेच अध्यापक होते. जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ वेद, उपनिषदे आणि गीता यांची निर्मिती भारतामध्येच झाली. व्यास, भवभूती, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, तुलसीदास यांसारख्या प्रतिभावंतांनी आपल्या काव्यवैभवाने जगाला विस्मित केले.

(b) पुढील मुद्द्यांवरून गोष्ट लिहा : *8*

बेइमान हलवाई — वजनात खोटेपणा — मुलगा मिठाई घ्यायला येतो — वजन कमी — मुलाची तक्रार — हलवाई म्हणतो, "ठीक आहे ना ! तुला ओझे कमी पडेल" — मुलगा पैसे कमी देतो — हलवाई म्हणतो, "पैसे कमी आहेत" — मुलगा म्हणतो, "ठीक आहे ना ! तुम्हाला मोजण्याचे श्रम कमी होतील !"

## SECTION C – (Comprehension)

**5.** खालील उतारा वाचून त्यावर दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

माणसाला प्रतिभेची नव्हे, तर उद्दिष्टाची गरज असते. लक्षात घ्या, डोळे झाकून सोडलेला बाण कधी लक्ष्याचा वेध करू शकत नाही; आंधळेपणाने धावल्याने मार्ग सरत नाही; डोळे झाकून बिगर मोसमात बी फेकणारा शेतकरी कधी पीक काढू शकत नाही. अशा माणसाला तुम्ही काय म्हणाल, की जो गाडीत बसण्यासाठी स्टेशनवर तर पोचला आहे, पण ज्याला हेच ठाऊक नाही की त्याला कुठे जायचे आहे ! आपण सर्वजण देखील जगाच्या सागरावर आलेले आहोत. जीवनाच्या नौकेला जगामध्ये वल्हवण्यापूर्वी आपण हे समजून घेतले पाहिजे की आपल्याला जायचे कोठे आहे ? म्हणून आपण आपले हे झाकलेले डोळे उघडूया, उद्दिष्ट निश्चित करूया आणि मार्गक्रमण सुरू करूया. ज्या नावाड्याने लक्ष्य स्थिर केलेले नसेल, त्याला अनुकूल वारा कधी सुटणारच नाही. तुम्ही काही एखादे प्रेत नाही आहात की संसारसागराच्या लाटांनी तुम्हाला हव्या त्या किनाऱ्यावर भिरकावून द्यावे; परिस्थितीने वाटेल तिकडे ओढून न्यावे ! नाशिबावर हवाला ठेवून तुम्हाला प्रवाहात वाहून जायचे नाही, तर प्रवाहाचा रोख आपल्याला हवा तसा बदलायचा आहे ! हे करताना अनेक संकटे येतील, झुंजावे लागेल, धैर्याची कसोटी लागेल, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल; पण तुमचे उद्दिष्ट निश्चित असेल तर अंतिम विजय तुमचाच आहे !

(a) धनुर्धारी, पथिक आणि शेतकरी यांची उदाहरणे कशासाठी दिली आहेत ? *2*

(i) शेतीचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी

(ii) डोळे उघडून मार्ग क्रमण करण्यासाठी

(iii) तिरंदाजीचे कौशल्य स्पष्ट करण्यासाठी

(iv) उद्दिष्टाची गरज स्पष्ट करण्यासाठी



Click for Answer Key: http://www.respaper.com/cbse10/141/8514.pdf

(b) पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द परस्परांशी संबंधित आहेत ? 2

(i) बाण, लक्ष्य, वेध, मार्ग

(ii) बी, शेतकरी, गाडी, स्टेशन

(iii) सागर, नौका, वल्ही, नावाडी

(iv) किनारा, प्रेत, प्रवाह, धैर्य

(c) या उताऱ्यात कोणत्या गोष्टीचे महत्त्व विशद केलेले आहे ? 3

(d) 'प्रवाहाचा रोख बदलायचा आहे' म्हणजे काय ? 3

## SECTION D – (Literature)

**6.** खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 15

(i) चाफ्याच्या झाडाबद्दल लेखकाने काय म्हटले आहे ?

(ii) 'भास्करबुवा' होण्यासाठी भास्करला कोणते परिश्रम घ्यावे लागले ?

(iii) आक्का घरी आली तेव्हा तिची अवस्था कशी होती ?

(iv) सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी कोणती माहिती लेखकाने दिली आहे ?

(v) हरिहरराव सोनुले यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू कोणते होते ?

**7.** (a) जिव्हाळा लाभल्याने काय घडणार आहे ? (कविता 'तहान') 2

(i) पाषाणातून मूर्ती घडणार आहे.

(ii) पाषाणाची फुले होणार आहेत.

(iii) पाषाण कोरडा राहणार आहे.

(iv) पाषाणावर रेघ उमटणार आहे.

(b) पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 3

(i) 'अंधार पखाली' या कवितेत कवीने कोणते प्रश्न उपस्थित केले आहेत ?

(ii) 'कसं चालेल ?' असा प्रश्न कवी कोणत्या संदर्भात करतात ?

(c) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** काव्यपंक्तींचे संदर्भ देऊन स्पष्टीकरण लिहा : 10

(i) "तुकोबा जोतीबा
मनोभावे स्मरू
संघर्ष उभारू
श्रमिकांचा"

(ii) "सर्व काही देता यावे, श्रेय राहू नये हाती;
यावी लाविता कपाळी भक्तिभावनेने माती."

(iii) "ज्योत ज्योतीने जागवा करा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा"

**8.** (a) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ? 6

(b) "या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या एक कुटुंबीय आहेत" असे प्रीतम का म्हणाला ? 4



Click for Answer Key: http://www.respaper.com/cbse10/141/8514.pdf